# जाहीर नोटीस

## पुणे येंथील कौटुंबिक न्यायालय,पुणे यांचे न्यायालयात

सी. टी. सर्व्हे नं. ३४, फायनल प्लॉट क्र. ८१६/१,
जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे जवळ,
शिवाजीनगर, पुणे ४११ ००५.

संदर्भ – मा. प्रभारी प्रमुख न्यायाधीश , कौटुंबिक न्यायालय, पुणे यांचे दिनांक १६/०१/२०२१ रोजीचे आदेशान्वये

या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कौटुंबिक न्यायालय, पुणे यांच्या अखत्यारीतील न्यायालयांच्या व कार्यालयांच्या वापरातील खालील नमूद शासकीय फर्निचर निर्लेखित करण्यात आलेले असून सदर जडवस्तूंची दरपत्रकाद्वारे विक्री करावयाची असल्याने त्याबाबतची जाहिर नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे.

| अनु.क्र. | जडवस्तूचे नांव | एकूण संख्या |
|---|---|---|
| १ | लाकडी संगणक टेबल ( नादुरुस्त ) | ०८ नग |
| २ | फॅकिंग मशीन | ०१ नग |

वरील सर्व वस्तूंच्या निविदा /दरपत्रके संदर्भातील अटी व शर्तींचा मसुदा तसेच निविदा फॉर्मचा नमुना गृहशाखा, कौटुंबिक न्यायालय, पुणे येथे शासकीय सुट्ट्या वगळून कार्यालयीन कामकाजाचे दिवशी दिनांक १६/०१/२०२१ रोजीपासून पुढील एक आठवडयात दिनांक २५/०१/२०२१ पर्यंत घेवुन जाव्यात.

सदरची निविदा /दरपत्रक व्यवस्थित भरुन तसेच निविदेवर निकामी व तुटलेल्या संगणक लाकडी टेबल व फ्रॅकिंग मशीन इत्यादी खरेदीबाबतची निविदा असा उल्लेख करुन सिलबंद लिफाफा असलेली निविदा प्रबंधक, कौटुंबिक न्यायालय, पुणे या कार्यालयात दिनांक २७ /०१/२०२० रोजी दुपारी १२.०० वाजता किंवा तत्पुर्वी पोहोच होईल, याची काळजी घ्यावी.

सदर अटी व शर्तींच्या अधिन राहून निविदा भरण्यात याव्यात, निविदा विहीत मुदतीत प्राप्त न झाल्यास व या कार्यालयाकडून पुरविण्यात आलेल्या विहीत नमुन्यातील फॉर्मवरती निविदा न भरल्यास अशा निविदा अर्जाचा विचार केला जाणार नाही. सदरच्या सर्व निविदा न भरल्यास अशा निविदा अर्जाचा विचार केला जाणार नाही. सदरच्या सर्व निविदा दिनांक २७/०१/२०२० रोजी दुपारी ठिक ०४.३० वाजता मा. प्रमुख न्यायाधीश, कौटुंबिक न्यायालय, पुणे यांचे निजीकक्षामध्ये उघडण्यात येतील, त्यामुळे संबंधीत निविदाधारक यांनी समक्ष उपस्थित रहावे.

निविदा अंशता, पुर्णता कोणतेही कारण न देता स्विकारण्याचा अथवा नामंजूर करण्याचा अंतिम अधिकार हा मा. प्रमुख न्यायाधीश, कौटुंबिक न्यायालय, पुणे यांनी राखून ठेवला आहे. यांची नोंद घ्यावी.

पुणे.
दिनांक १६/०१/२०२१.

प्रबंधक,
कौटुंबिक न्यायालय, पुणे.

# कौटुंबिक न्यायालय, पुणे.

## शासकीय निर्लेखित केलेल्या फर्निचरच्या विक्री बाबतच्या अटी/शर्ती

ठिकाण - कौटुंबिक न्यायालय, पुणे येथील तळमजल्याच्या पार्किंग मधील जागेत.

कौटुंबिक न्यायालय, पुणे या कार्यालयाचे खालील शासकीय फर्निचर निर्लेखित ठरविण्यात आलेले आहे. व सदरचे फर्निचरची दरपत्रकद्वारे विक्री करण्यात येत आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ. क्र. | फर्निचर प्रकार/ साहित्याचे नाव | जडवस्तू क्र. | एकूण नगांची संख्या | संदर्भ क्र.३ चे सह शिटमधील **Depreciation** नूसार. घसारा किंमत. |
|---|---|---|---|---|
| १. | संगणक लाकडी टेबल | FC/PN/T/02/2005 | 08 | **Rs. 3706/-** (depreciation Cost Including total 08 Computer table as per attached sheet) |
| | | FC/PN/T/03/2005 | | |
| | | FC/PN/T/04/2005 | | |
| | | FC/PN/T/05/2005 | | |
| | | FC/PN/T/07/2005 | | |
| | | FC/PN/T/08/2005 | | |
| | | FC/PN/T/09/2005 | | |
| | | FC/PN/T/10/2005 | | |
| २. | फ्रॅकिंग मशीन | FC/PN/FM/01/05 | 01 | **1775/-** |

## लिलावाच्या अटी / शर्ती -

१. विक्रीस काढण्यात आलेले फर्निचरची विक्री आहे त्या स्थितीत होणार आहे. निकामी व तुटलेले फर्निचर इत्यादी वस्तू गठ्ठा पध्दतीने विकावयाचे आहे. सदर वस्तूंचा एक गठ्ठा संबंधितांना हस्तांतरीत करीत असताना सदर निकामी व तुटलेल्या फर्निचरच्या वस्तू मध्ये काही दोष उद्भवल्यास त्याबाबत कौटुंबिक न्यायालय, पुणे यांची कोणतीही जबाबदारी राहणार नाही. वाहतूक आणि जकात इत्यादी बाबतचा निकामी व तुटलेल्या फर्निचर इत्यादी वस्तूंचा एक गठ्ठा खरेदी करणा-या कंपनीस किंवा संबंधित इसमास करावा लागेल. त्याबाबत कोणतीही

तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

२. ज्या निविदाधारकाची निविदा स्विकारण्यात आली आहे. अशा निविदाधारकाने त्वरीत त्याच दिवशी सदर निविदेची संपूर्ण रक्कम भरावी व सदर निर्लेखित केलेले फर्निचर आहे त्या स्थितीमध्ये सात दिवसामध्ये घेवून जाणे बंधनकारक राहील. रक्कम पुर्ण भरल्यानंतर विकण्यात आलेल्या वस्तू ०७ दिवसाचे आत स्वखर्चाने घेऊन जाणे बंधनकारक राहील.

३. सोबत जोडलेलया यादमधील एक गठ्ठयामध्ये (lot) अनु. क्र. ०१ ते ०२ मधील निर्लेखित केलेल्या जडवस्तूंची कमीत कमी एकत्रित किंमत हि रुपये ५४८१/- (अक्षरी रक्कम रुपये पाच हजार चारशे ऐक्याऐंशी फक्त) असल्याने त्या अनुषंगाने निविदा येणे अपेक्षित आहे.

४. निकामी व तुटलेल्या फर्निचर इत्यादी वस्तू पहावयाचे असल्यास गृहशाखा कौटुंबिक न्यायालय, पुणे येथे कार्यालयीन कामकाजाचे दिवशी सकाळी १०.३० ते सायं. ४.०० या कालावधीमध्ये दिनांक २५/०१/२०२१ पर्यंत उपलब्ध असेल.

५. एकदा सिलबंद लिफाफ्यामध्ये निविदा सादर केल्यानंतर सदरची निविदा ही विक्रीस काढण्यात आलेले निकामी व तुटलेल्या फर्निचर इत्यादी वस्तुंचा गठ्ठा पाहूनच भरण्यात आलेली असे समजण्यात येईल.

६. लिलाव घेणा-याने स्वतःचे पॅनकार्ड / निवडणूक ओळखपत्र/ आधारकार्ड मूळ व छायांकित प्रत सादर करावी.

७. निविदा अंशतः पुर्णतः कोणतेही कारण न देता स्विकारण्याचा अथवा नामंजूर करण्याचा अंतिम अधिकार हा मा. प्रमुख न्यायाधीश, कौटुंबिक न्यायालय, पुणे यांनी राखून ठेवला आहे याची नोंद घ्यावी.

हुकूमावरुन,

पुणे.
दिनांक १६/०१/२०२१.

प्रबंधक,
कौटुंबिक न्यायालय, पुणे.